महाराष्ट्र शासन
वनविभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
Email ID :apccfhrmadmn@gmail.com, दूरध्वनी क्र .०७१२-२५५६७९२

---

ई-मेलव्दारे

क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/तीन/प्र.क्र.०७/२०२४-२५/828
नागपूर ४४०००१ दिनांक 10/10/2024

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
अमरावती

विषय:- वनपाल संवर्गातील कर्मचा-यांचे विशेष कारणास्तव मध्यावधी विनंती बदली प्रस्ताव

संदर्भ :-१) महसूल व वनविभाग,शासन निर्णय, एफएसटी-१२/१७/प्र.क्र.६६४/फ-४, दिनांक ११/०१/२०१८

२) आपलेकडील पत्र क्र. कक्ष-८/आस्था/TN-१/विनंती बदली प्रस्ताव/१६९४, दि.३०/०८/२०२४

आपण संदर्भिय पत्रान्वये विशेष कारणास्तव आंतरविभागीय सादर केलेल्या प्रस्तावाचा विचार करुन, बदली अधिनियम-२००५ मधील नियम ४(४) व ४(५) मधील तरतूदीनुसार तसेच महसूल व विभाग, शासन निर्णय क्रमांक एफएसटी-१२/१७/ प्र.क्र.६६४/फ-४, दिनांक ११/०१/२०१८ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन विनंती बदलीबाबत खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

**वनपाल संवर्गातील कर्मचा-यांची विनंती बदलीची प्रकरणे :-**

| अ. क्र. | वनपालाचे नाव | कार्यरत पदनाम | बदलीनंतरचे पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री गजानन कडूबा कायंदे | वनपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, खामगांव सामाजिक वनीकरण विभाग, बुलडाणा | वनपाल, सामाजिक वनीकरण देऊळगाव राजा परिक्षेत्र, सामाजिक वनीकरण विभाग, बुलडाणा (रिक्त पदावर) |
| २. | कु. संगिता हरिचंद्र बुंदेले | वनपाल फिरते पथक, धारणी मेळघाट प्रा., वनविभाग परतवाडा | वनपाल विशेष सेवा (रोहयो), चांदूर रेल्वे परिक्षेत्र, अमरावती वनविभाग (रिक्त पदावर) |

२.	सदरची बदली ही संबंधित कर्मचारी यांचे विनंतीनुसार करण्यात येत असल्याने,त्यांना पदग्रहण अवधी व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. तरी त्यांना बदलीचे ठिकाणी रुजू होण्याकरिता तात्काळ कार्यमुक्त करणेबाबत संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

३.	आपले प्रस्तावातील श्री नितीन रमेश काळे यांची बदली वनपाल, सामाजिक वनीकरण मोर्शी, सामाजिक वनीकरण विभाग,अमरावती या पदावर प्रस्तावित केली आहे. तथापी या कार्यालयास श्री एस.एस.काळे, वनपाल, सामाजिक वनीकरण,मोर्शी यांचा अर्ज दि.९/०९/२०२४ प्राप्त झाला असुन, सदर अर्जासोबत मुळ अर्ज क्र.८८०/२०२४ मध्ये दि.६/०९/२०२४ रोजी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी दिलेल्या ओदशाची प्रत जोडली आहे. त्यामुळे श्री नितीन रमेश काळ, वनपाल यांचा प्रस्ताव मा. न्यायाधिकरणाची स्थगिती उठेपर्यंत स्थगीत ठेवण्यात येत आहे.

४.	प्रस्तावातील श्री जितेन रविंद्र माळोदे यांचेसाठी प्रस्तावित केलेली वनपाल,बोडा वर्तुळ, पातुर परिक्षेत्र, अकोला वनविभाग हे पद सद्यास्थितीत रिक्त नसल्याने व ते ३१/१०/२०२४ रोजी रिक्त होणार असल्याने सदर पद रिक्त झाल्यानंतर सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल.

(एम. श्रीनिवास राव)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुय्यम संवर्ग)